




# प्रोफाईल हॅकिंग

९ तुमचे प्रोफाईल तेव्हा हॅक केले जाते जेव्हा एखादा सायबर भामटा/स्टॉकर तुमच्या ई मेल किंवा सोशल मीडियामध्ये अवैधरित्या गुपचूप प्रवेश करू शकेल.



सायबर कॅफे मध्ये जाऊन इंटरनेटवर सर्फिंग करण्याची तनुजाला खूप आवडते.




एक दिवस ती फेसबुक वापरत होती आणि दुसऱ्या विंडोवर तिचे जी मेल उघडे होते.



तिला अचानक घरून फोन आला की तिच्या आजोबांना के सी एम रुग्णालयात दाखल केले आहे.



तनुजा धावत रुग्णालयात गेली, तिच्या आजोबांवर तिचा खूप जीव होता.




रुग्णालयात पोहोचल्यावर तनुजाला तिच्या मोबाईलवर दोन अलर्ट मेसेजेस आले की तिच्या जीमेलचा आणि फेसबुकचा पासवर्ड बदलण्यात आला आहे.




तनुजाला कळाले की, तिने जाताना सिस्टीम मधून लॉगआउट केले नव्हते. त्यामुळे तिच्या अकाउंट मध्ये फेरफार केला गेला.



- सार्वजनिक सेवा देणाऱ्या संगणकाचा वापर करताना काम झाल्यावर किंवा निघताना लॉग आउट करायला विसरू नका.



- पासवर्ड टाकताना किंवा अन्य संवेदनशील माहिती टाकताना व्हर्चुअल की बोर्ड वापरा.



- हॉटेल्स, विमानतळ, सार्वजनिक ठिकाणे इथे उपलब्ध मोफत वाय फाय सुविधा वापरणे टाळा. जेव्हा आवश्यकता भासेल तेव्हा व्हीपीएन वापरा.






## ऑनलाईन गेम्स

१० ज्या मुली एकलकोंड्या, कमी आत्मविश्वास असणाऱ्या आणि नैराश्याने ग्रासलेल्या असतात त्या धोकादायक ऑनलाईन गेम्सला बळी पडतात आणि त्यांना त्याचे व्यसन लागते आणि नंतर त्यांचे त्या नुकसान करवून घेतात. ब्ल्यू व्हेल चेलेंज सारख्या कुप्रसिध्द गेम्समुळे तर अनेकांना प्राण गमवावे लागले आहेत. हे एक वैयक्तिक आणि सामाजिक आव्हान आहे.



- देविका ही अभियांत्रिकीच्या पहिल्या वर्षात शिकणारी विद्यार्थिनी आहे जी कर्नाटकातल्या एका दुर्गम खेड्यातून आली आहे.



- तिची राहणी अगदी साधी असल्याने तिचे वर्गमित्र तिला टाळतात. मुलींच्या एखाद्या गटात जाण्यासाठी तिला कोणी ऑनलाईन मैत्रिणी नव्हत्या.




- एकटेपणामुळे तिने तिच्या ई मेलवर आलेल्या एका लिंकवर क्लिक केले ज्यात लिहिले होते. द ब्ल्यू व्हेल गेम - तुम्ही तयार आहात का?



- देविका उत्साहाने गेम खेळायला तयार झाली. त्यात पन्नास लेव्हल्स होत्या. प्रत्येक लेव्हलला एक एक काम पूर्ण करून दाखवायचे होते.



- प्रत्येक काम/ टास्क पूर्ण केल्यावर तिचे एडमिनकडून कौतुक होत असे. त्यामुळे तिला खूप चांगले वाटत असे. तिच्या मेंदूत डोपामाईन आणखी आणखी स्त्रवत असे आणि तसतशी त्या व्यसनात गुरफटत गेली.



- सुरीने शरीरावर व्हेलचा टॅट्यू काढून गोंदवून घेणे. गच्चीच्या कठड्यावरून चालणे, मध्यरात्री स्मशानात जाणे असे टास्क तिने पूर्ण केले.




- तिच्या वर्गमित्र मैत्रिणींना आणि तिच्या शिक्षकांनाही तिच्यात बदल दिसू लागले. मात्र कोणाला त्याबद्दल तिला काही विचारावे वाटले नाही. ती एव्हाना तिच्या ॲडमीनला शरण गेली होती.



- शेवटचे कार्य / टास्क होता मध्यरात्री एक वाजता गळफास लाऊन आत्महत्या करणे. कोणतीही भीती किंवा किंतु न बाळगता देविकाने आपल्या पालकांसाठी एक माफीपत्र लिहिले आणि स्वतःला गळफास लाऊन घेतला. एक मौल्यवान आयुष्य नष्ट झाले.




- त्या पत्रात लिहिले होते की, मला वाटले माझी कोणी काळजी घ्यावी, माझ्यावर प्रेम करावे, आपल्यात सामावून घ्यावे. पण माझ्याकडे सगळ्यांनी दुर्लक्ष केले आणि सतत वेगळे एकटे पाडले. काय अर्थ आहे मग जगण्याला.






# जॉब कॉल लेटर

११ खरेपणा आणि अधिकृतता तपासण्यासाठी नोकऱ्या पुरवणाऱ्या वेबसाईटची नीट पडताळणी करून खात्री केली पाहिजे. मेलला उत्तर देताना ते दोन दोनदा तपासा आणि खात्री करून घ्या आणि मग सांगितलेल्या सूचना पाळा, विशेषतः तेव्हा जेव्हा आपली वैयक्तिक माहिती विचारली असेल.



- निशिताने पहिल्या वर्गात अभियांत्रिकीचे शिक्षण पूर्ण केले. मात्र तिला कॉलेज कॅम्पस मध्ये नोकरी मिळाली नाही.



- नोकरी मिळवण्याच्या आशेने ती नेहमी आपला रिझ्युम नोकरी डॉट कॉम आणि अन्य नोकरी पुरवणाऱ्या वेबसाईटवर अपलोड करत असे.



- एक दिवस एका प्रतिष्ठित कंपनीकडून तिला कॉल लेटर आले आणि तिला सात आकडी पगार देण्याचे त्यात लिहिले होते.




नोकरीसाठीची मुलाखत (इंटरव्ह्यू) एका पंचतारांकित हॉटेल मध्ये आयोजित केला होता. निशिता रिक्षाने त्या हॉटेलला गेली.




तिला एका सूट मध्ये थांबण्यास सांगितले गेले जिथे तिला नोकरीसाठी आलेले अनेक उमेदवार बसलेले दिसले.




आता निशिताची पाळी आली आणि मुलाखत (इंटरव्हू) सुरू करण्यापूर्वी तिला एक सरबत देण्यात आले. थोड्याच वेळात तिला गुंगी आल्यासारखे वाटू लागले.



- ते सरबत प्याल्यावर काय घडले ते निशिताला अजिबात आठवत नाही. ती एका पलंगावर होती आणि तिच्या अंगावर कपडे नव्हते. तिचे शोषण करण्यात आले होते.



- नंतर तिला जाणवले की, तिला आलेला मेल हा फिशिंग मेल होता आणि तिने त्याची तपासणी करून खात्री केली नव्हती.




- नोकरी मिळण्याची आशा असणाऱ्या निशितासारख्या लाखो मुली आणि महिला अशा नाडल्या जातात आणि त्यांचे शोषण होते, इतकेच नव्हे तर अनेक जणींची आर्थिक फसवणूकही केली जाते.





# डीप फेक्स



**१२** डीप फेक्स हे असे तंत्र आहे ज्याने मूळ फोटो आणि व्हिडिओ मध्ये दुसरे फोटो किंवा व्हिडिओ बेमालूमपणे चिकटवून (सुपरइम्पोज करून) नवे बनावट फोटो व्हिडिओ तयार करता येतात.एखाद्याचा आवाज किंवा चेहरा अशा प्रकारे लाऊन नवे व्हिडिओ तयार करता येतात की पाहणाऱ्याला किंवा ऐकणाऱ्याला त्याच्या खरेपणाबद्दल शंका सुध्दा येणार नाही. यासाठी हे तंत्र वापरले जाते.

- जेनेट ही एम.बी.बी.एस.च्या शेवटच्या वर्षात शिकते. तिचे तीन वर्षापासून जॉन बरोबर नाते आहे.



- ती इंस्टाग्राम आणि टिकटॉक वर नियमितपणे काही ना काही अपलोड करत असते. दिवसाला किमान दोन तरी पोस्ट तिच्या असतातच.



- काही गैरसमज झाल्याने जेनेट जॉनला टाळू लागली. तिला सिनीअर असणाऱ्या अर्जुनला ती खूप दिवसापासून आवडत होती.



- अर्जुनने संधी साधली आणि जेनेटला प्रपोज केले. तिने होकार दिला. मात्र नंतर तिला जॉनला धोका दिल्याचा पश्चाताप वाटू लागला.



- एका आठवड्यातच तिने अर्जुन बरोबर ब्रेकअप केले आणि माफी मागून पुन्हा जॉनकडे गेली.




- आपल्या भावनांशी खेळल्याबद्दल रागावलेल्या अर्जुने जेनेटला धडा शिकवण्याचे ठरवले.



- तिचे इंस्टाग्राम फोटोज आणि टिकटोक व्हिडिओज वापरून अर्जुनने कृत्रिम बुद्धीमत्ता व तशीच अन्य साधनांच्या मदतीने डीपफेक्स तयार केले.



- डीपफेक व्हिडिओज मध्ये असे दिसत होते की जेनेटने अनेक जणांशी शारीरिक संबंध ठेवले आहेत. ते सगळे सोशल मीडियावर पसरवले.



- ज्यांनी ज्यांनी ते व्हिडिओज पाहिले त्यांनी त्यावर विश्वास ठेवला. आता जेनेट खूप घाबरून गेली आहे. आपले इतके स्पष्ट फोटो आणि व्हिडिओज सोशल मीडियावर पोष्ट केल्याबद्दल तिला पश्चात्ताप होऊ लागला.





# डेटिंग वेबसाईट


**१३** डेटिंग साईटसवर स्त्रियांशी गोड बोलून त्यांच्या भावनांशी खेळले जाते. अशा साईट वर संभाव्य जोडीदाराला त्या जे खासगी फोटो आणि मेसेज पाठवतात त्याच्या गुन्हेगारी प्रवृत्ती असणारे लोक सहज दुरुपयोग करू शकतात.



रश्मी एमबीबीएसच्या पहिल्या वर्षात शिकणारी विद्यार्थीनी आहे. तिला नुकताच मिस फ्रेशरचा किताब मिळाला.



आपल्या मित्रांशी नेहमी ऑनलाईन बोलण्याची तिला सवय आहे. मात्र नेहमी त्याच लोकांशी बोलून तिला कंटाळा आला होता.



एक दिवशी तिने टिंडरवर नाव नोंदवले आणि डावीकडे उजवीकडे स्वाईप करणे सुरू केले.



- तिची शाक्स बरोबर ओळख झाली. तो दिसायला खूप छान, उच्चभ्रू होता. त्याच्याकडे भारी कार वगैरे होत्या. सतत पार्ट्या आणि प्रवास करत असे.



- शाक्सने रश्मीशी गोड बोलून आपल्या व्यक्तिमत्वाचा प्रभाव पाडला आणि तिच्याशी मेसेज वर बोलणे सुरु केले. रात्री उशिरापर्यंत फोनवर बोलणे आणि अखेर त्यांनी प्रत्यक्ष भेटण्याचे ठरवले.



- शाक्स तिला शहरातल्या सर्वोत्तम हॉटेल मध्ये कॅन्डल लाईट डिनरसाठी घेऊन गेला. रश्मीला अगदी खात्री वाटली की हाच तिच्या स्वप्नातला राजकुमार आहे.



- दोन चार दिवसांने शाक्सने रश्मीला सांगितले की आयकर अधिकाऱ्यांनी त्याचे खाते गोठवले आहे आणि त्याला तात्काळ दोन लाख रुपयांची गरज आहे. तिने आपले सोन्याचे दागिने विकले आणि त्याला पैसे दिले.



- मग शाक्सने तिला ब्लॉक केले. नंतर तिच्या एका मैत्रिणी कडून तिला कळले की, शाक्सचे लग्न झालेले आहे आणि तो अशाच पद्धतीने मुलींना फसवतो.



- डेटिंग साईटवरच्या अनोळखी माणसावर असा विश्वास ठेवल्याबद्दल आणि त्याला खासगी फोटो व्हिडिओज पाठवल्याबद्दल तिला पश्चाताप होऊ लागला.





# कॅमेरा हॅकिंग

**१४**

कॅमेरा हॅकिंग तेव्हा होते जेव्हा एखाद्या एटेचमेंटसह डाऊनलोड झालेले अवैध सॉफ्टवेअर / मालवेवअरद्वारे एखाद्या व्यक्तीचे तिच्या संमती शिवाय फोटो घेतले जातात. कॅमेरा गार्ड नसणारा मोबाईल फोन अशा गुन्हेगारी कामात बळी पडू शकतो.



- मनीषा तिच्या महाविद्यालयातली सगळ्यात कूल म्हणून ओळखली जाणारी मुलगी आहे.




- मेल चेक करणे, सोशल मीडियावर राहणे, पैसे ट्रान्स्फर करून व्यवहार करणे. यासाठी ती आपला फोन वापरते.




- ती आपला फोन नेहमी वॉशरूम मध्ये नेऊन वापरते.



- एकदा मेसेजवर तिच्याकडून एक फाईल डाऊनलोड झाल्याचे तिला माहीतच नाही, ज्यामध्ये एका मालवेअरसह ट्रोजन (छुपे सॉफ्टवेअर) होते.



- त्या मालवेअरने तिच्या फोनचे फ्रंट / पुढील आणि बॅक / मागील दोन्ही कॅमेरे तिच्या नकळत सुरु केले आणि व्हिडिओ घ्यायला सुरुवात केली.



- मालवेअर बद्दल काही कल्पनाच नसलेल्या मनीषाने बाथरूम मध्ये आपला फोन एका बाजूला ठेवला आणि अंघोळ केली.




- एक दिवस तिचा मित्र जोएलने तिला सांगितले की तिचा शॉवरने नाहतानाचा व्हिडिओ एका पॉर्न साईटवर त्याने पाहिला आहे.




- तिला धक्का बसला. तिच्या फोन मध्ये एन्टी व्हायरस नव्हते. ज्याने तिचा फोन सुरक्षित राहू शकला असता.



- मोबाईल फ्लिप केस आणि कॅमेरा कव्हर न लावल्याबद्दल तिला पश्चाताप झाला.






# सोशल ट्रोलिंग

**१५** एखादी व्यक्ती किंवा संस्था यांच्याबद्दल ऑनलाईन कम्युनिटिवर प्रक्षोभक व्यक्तव्य करणाऱ्या पोस्ट्स करणे ज्याचा उघड उघड उद्देश हा त्या व्यक्ती किंवा संस्थेची मानहानी करणे आणि त्रास देणे असतो.



श्रुती मध्यमवर्गीय कुटुंबातली एक साधी मुलगी आहे. नैतिकता आणि संस्कारावर तिचा विश्वास आहे.



ती ज्या महाविद्यालयात शिकते तिथले बहुतांश विद्यार्थी फॅशनेबल आणि स्वैर प्रवृत्तीचे आहेत.




रोजच ते श्रुतीची चेष्टा करतात, तिला नावे ठेवतात आणि तिला अपमानास्पद वागवतात.



महाविद्यालयातला सर्वात प्रसिद्ध मुलगा रोहन श्रुतीला गावंढळ म्हणून चिडवतो आणि आपल्या खेडे गावात परत जा असे म्हणत असतो.



या सगळया गोष्टीचा अंत करायचा असे श्रुतीने ठरवले. तिने हिम्मत केली आणि त्याला सुनावले की तू स्वतःचे काम कर माझ्या नादी लागू नकोस.



रागावलेला रोहन घरी गेला आणि त्याने काही अश्लील विनोद (एडल्ट जोक) श्रुतीचे नांव घालून तयार केले आणि त्याच्या मित्रांना पाठवले.



- त्याने श्रुतीचे एक ट्रोल पेज तयार केले आणि त्यावर तिचे मिम्स आणि विनोदी व्हिडिओ तयार करून टाकले.




- श्रुती आता महाविद्यालयात एक चेष्टेचा विषय झाली आणि तिने आपले शिक्षण सोडून द्यायचे ठरविले.



- नंतर श्रुतीला वाटले की तिने महाविद्यालयातल्य प्राध्यापक आणि प्राचार्यांना किंवा व्यवस्थापनाला हे सांगायला पाहिजे होते आणि पोलीसात तक्रार द्यायला पाहिजे होती.



# आवश्यक सूचना

## महिला आणि सायबर गुन्हे

### १ सामाजिक संबंध



एखादी व्यक्ती वापरत असलेला फोन किंवा संगणक यात प्रवेश मिळविण्यापेक्षा (हॅक करणे) तो फोन किंवा संगणक वापरत असलेल्या व्यक्तीच्या मनात प्रवेश करणे जास्त सोपे असते.

सोशलमीडियामुळे आपण अगदी अनोळखी लोकांशी सुद्धा संवाद साधत त्यांना माहिती देत असतो त्यामुळे गुन्हेगाराच्या गुन्हे करण्याच्या युक्त्यांना आणि पद्धतींना आपण बळी पडतो.

आपल्याला कार्डस आणि कर्ज यासाठी बँकांकडून, विमा कंपन्या, पर्यटन कंपन्या आणि रिसॉर्ट, आयटी विभाग, रिझर्व बँक, ऑनलाईन मार्केटिंग असे अनेक कॉल्स आणि मॅसेजेस येत असतात. आपण त्यांची अधिकृतता कधी तपासतो का? आपण त्या कॉल करणाऱ्या व्यक्तीवर विश्वास ठेवतो आणि विचारेल ती माहिती देत जातो जी आपल्याला कॉल करणाऱ्याकडे नोंदवली जाते.

### सावधगिरी

असे म्हटले जाते की, तुम्हाला माहित आहे त्यापेक्षा कमीत कमी बोला व तुमच्याकडे जेव्हढे असेल त्यापेक्षा कमी दाखवा.त्यामुळे तुमच्याबद्दल कमी माहिती द्या आणि इतरांबद्दल जाणून घ्या.







## २ बदला घेणे

आपली मित्र मंडळी आणि परिचित तसेच कौटुंबिक मैत्री असणाऱ्या व्यक्तींबरोबर त्यांच्याशी चांगले संबंध असणाच्या काळात काढलेले फोटो त्यांच्याशी चांगले संबंध असण्याच्या काळात काढलेले फोटो त्यांच्याशी नाते बिघडल्यावर किंवा कौटुंबिक वाद झाल्यावर तुमच्यासाठी नुकसान कारक ठरू शकतात.

### सावधगिरी

मित्रमंडळी आणि परिचित तसेच कौटुंबिक मैत्री असणाऱ्या व्यक्तीबरोबर कमीत कमी फोटो काढा आणि सावधानतेचा इशारा विसरू नका.

## ३ दुसऱ्याचे शारीरिक संबंध पाहण्याची विकृती

पिन होल कमेरा आणि अत्याधुनिक स्पाय कॅमेरा अशा शोधांमुळे आपल्या खासगी आयुष्याला मोठाच धोका निर्माण झाला आहे आणि ते कॅमेरे सहज दिसतही नाहीत. ते मॉल्स, कापड दुकानात कपडे बदलण्याच्या खोल्या, प्रसाधनगृहे, रुग्णालये, वैद्यकिय निदान करणारी केंद्रे तसेच कार्यालये आणि तेथील प्रसाधनगृहे अशा ठिकाणी लपवले जाऊ शकतात.

### सावधगिरी

हा गुन्हा रोखण्यासाठी अगदी ठोस उपाय नसले तरीही संशयास्पद वस्तू आणि जागा जसे की, खिडक्यांचे पट, पडदे आणि त्याचे रॉडस, फुलदाण्या, मुर्त्या, फोटो फ्रेम्स, बल्ब्स, नाईट लॅम्स, टेबलाचे खण आणि भिंतीवर लावलेल्या कोणत्याही वस्तू तपासून पहाव्यात.



## ४ इंटरनेटद्वारा पाळत (सायबर स्टॉकिंग)

अनोळखी व्यक्ती तुमच्यावर विविध सोशल मीडिया, चाटरूम, मॅसेंजर इत्यादीद्वारा पाळत ठेऊ शकते आणि तुम्हाला घाबरवू शकते.धमकावू शकते, त्या विरूध्द आवाज उठवला पाहिजे.

### सावधगिरी

अनोळखी लोकांशी संवाद साधू नका.त्यांचे म्हणणे मानू नका पण त्यांच्याशी उद्धटपणे वागू नका कारण त्यांचा अहंकार दुखावला जाऊन ते बदला घेण्यासाठी त्रास देतात असे अनेकदा निदर्शनास आले आहे.

## ५ इंटरनेटद्वारा दादागिरी (सायबर बुलिंग)

अज्ञानी, लहान मुलांना त्रास देणारे,मानसिक छळ करणारे, धमकी देणार किंवा नैराश्य आणणारे अगदी आत्महत्येला प्रवृत्त करणारे संदेश त्रास देण्यासाठी पाठवले जातात.

### सावधगिरी

असे मॅसेजेस येताच आपले पालक, शिक्षक आणि घरातील वडीलधाऱ्या व्यक्तींना दाखवावेत, जेणेकरून त्यांना परिस्थितीचे गांभीर्य कळेल आणि त्या अनुषंगाने पावले उचलतील.अशा गोष्टींना स्वतः तोंड देत बसू नका, सहन करू नका किंवा दुर्लक्ष करू नका.

## ६ फोटो एडिटिंग एप्लिकेशन

तुमची फोटोतील प्रतिमा आणखी सुंदर करणारे फोटो एडिटिंग एप्लिकेशन्स फोटोची मुळप्रत ठेऊन घेतात जी तुम्ही अपलोड केलेली असते आणि मग गुन्हेगारी प्रवृत्तीचे लोक त्याचा गैर वापर करून तुम्हाला नुकसान पोहोचवू शकतात.

### सावधगिरी

नामवंत आणि अधिकृत फोटो एडिटिंग एप्लिकेशन्स वापरा जे सुरक्षित एप स्टोअर वरून घेतले असतील. वाईट हेतू असणारे फोटो एडिटर फोटोत फेरबदल करून संकट निर्माण करू शकतात.



## ७ फ्री डाऊनलोड

संगीत, गाणी, व्हिडिओ गेम्स, फाईल शेअरिंग, सॉफ्टवेअर, एप्स, इ-बुक्स, इ. प्रत्येक फ्री डाऊन लोड बरोबर वोर्म्स, व्हायरल, ट्रोजन, मालवेअर, स्पायवेअर, की लॉगर्स सुद्धा आपसूक आपल्या सिस्टीम मध्ये येतात हे लक्षात ठेवा. तुमचा संगणक किंवा फोन अशा फ्री डाऊन लोड मुळे तशाच फुकटच्या संकटात सापडू शकतो.

### सावधगिरी

तुम्ही जिथून डाऊनलोड करत आहात ते एप्स, टूल्स, वेबसाईट, पोर्टल, ऑनलाईन मार्केटिंग साईट,फाईल शेअरिंग,गेमिंग साईट यांची अधिकृतता आणि सुरक्षितता तपासा आणि मगच पुढे जा. तसेच तुमच्या फोन आणि संगणकात अधिकृत एन्टी व्हायरस असेल याची काळजी घ्या.

## ८ मला मान्य आहे, मी स्वीकारतो

संगीत, गाणी, व्हिडिओ गेम्स, फाईल शेअरिंग, सॉफ्टवेअर, एप्स, इ-बुक्स, इत्यादी डाऊन लोड करताना मी सगळया अटी शर्ती स्वीकारतो असे म्हणने सोपे आहे. मात्र त्या आधी हे जाणून घ्या की त्यामुळे पुढे तुम्हाला काय किंमत मोजावी लागणार आहे.

### सावधगिरी

मी स्वीकारतो, मी मान्य करतो यावर क्लिक करण्यापूर्वी हे लक्षात ठेवा की उडी मारण्याआधी  इकडे  तिकडे पहावे आणि पुढे जाण्याआधी विचार करावा ही सुरक्षेचीसूत्रे आहेत.

## ९ पासवर्ड / पासफ्रेज

ज्यांना काही अर्थ असतो असे पासवर्ड शोधून चोरणे सोपे असते. पासवर्ड तयार करताना आपल्या नशिबाचे आपणच शिल्पकार असतो,तुम्हाला लक्षात ठेवायला सोपा असणारा पण किचकट पासवर्ड ठेवत जा. तो कधीही कोणालाही सांगत जाऊ नका.

### सावधगिरी

पासवर्ड हा एखादा शब्द असू शकेल मात्र पासफ्रेज म्हणजे अधिक शब्दांचा समूह असू शकतो. पासफ्रेज हे पासवर्डपेक्षा अधिक सुरक्षित असते. त्यामुळे जेव्हा तुम्हाला पासवर्ड तयार करण्यास सांगितले जाते तेव्हा तो तयार करण्यासाठी कि बोर्ड वर उपलब्ध सगळे पर्याय वापरा. तो नेहमी बदलत रहा. वेगवेगळया अकाऊटसाठी वेगवेगळे पासवर्ड ठेवा.




## १० वेबकॅमचा खासगी जीवणाला धोका.

एखाद्या संगणकाच्या मालकाला / मालकिणीला माहित न होताच त्या सिस्टममध्ये प्रवेश मिळवणारे ट्रोजन टाकले जातात आणि त्यांच्या खासगी क्षणाचे चित्रण केले जाते व ते इंटरनेटवर पसरवले जाते, अशी अनेक प्रकरणे समोर आली आहेत. अनेकदा ते पॉर्न साईटवर सुद्धा टाकले जातात.

### सावधगिरी

तुमचा डेस्कटॉप / लॅपटॉप संगणक किंवा मोबाईल फोन यांचे कॅमेरे र्टप किंवा कपडा लावून  झाकून ठेवत  जा. त्यासाठी  रुमाल वर्तमानपत्र वापरत जा कारण ते दोन्ही बाजूने चित्रीकरण करू शकतात.




## ११ सोशल मीडिया

तुमच्या वास्तविक आयुष्यात तुम्ही  अनोळखी व्यक्तीबरोबर गप्पा मारता, भेटता? नाही ना ?मग सोशल मीडियाच्या आभासी जगात त्यांच्याशी संवाद का साधता ? फसवे, भामटे, गुन्हेगार याची वाटच पाहात असतात की तुम्ही त्यांची फ्रेंड रिक्वेस्ट कधी स्वीकारता. अनेक गुन्ह्यांच्या तपासात असे आढळले की, बहुतांश वेळा एखाद्या तरुण मुलीकडून आलेली फ्रेंड रिक्वेस्ट स्वीकारल्यावर नंतर तो मुलगा असल्याचे लक्षात येते. अनामिक राहणे हे सायबर गुन्हेगारांसाठी वरदान आहे.तुम्ही कुठे कोणाशी काय शेअर करत आहात यावर लक्ष ठेवा, भान ठेवा.

## सावधगिरी

काहीही शेअर करण्याआधी विचार करा. लक्षात ठेवा की ऑफलाईन जगात धैर्याने  डेअरिंगने आणि ऑनलाईन जगात शेअरिंगने आपण आपले नशीब घडवतो. तुमची ऑफ लाईन आणि ऑनलाईन तत्वे, मूल्य समान असले पाहिजेत.तुमच्या मित्रांबरोबर मजा करा मात्र अनोळखी लोकांना मात्र ब्लॉक करा.

# सायबर गुन्ह्यांचे प्रकार



## १२ अधिकृत परवानगी असणारी (लायसन्सड) सिस्टीम वापरा

तुमच्या डिव्हाईसवर नेहमी अधिकृत परवानगी असणारी ( लायसन्सड ) सिस्टीम वापरा क्रेक केलेली वापरू नका. यामुळे तुम्हाला खूपच जास्त सुरक्षित राहता येईल कारण ती सखोल संशोधन व विकास यातून तयार केलेली असते. अत्याधुनिक पेचेस आणि व्हर्जन्सने ती अद्यावत ठेवा.

## १३ अधिकृत परवानगी असणारी (लायसन्सड) एन्टीव्हायरस वापरा.

आपल्या शरीरातील आजार दूर करण्यासाठी असे एन्टीबायोटीक्स असतात तसेच डिजिटल उपकरणे नीट ठेवण्यासाठी एन्टीव्हायरस असतात. कायम अधिकृत एन्टीव्हायरस बाळगूनच सिस्टीम वापरा.

## १४ काळ धावतो आहे मात्र चूक ठिकाणी क्लिक केल्यास तो संकटासह आणखी वेगाने धावतो.

कमीत कमी फोटो, व्हिडिओ, फ्री डाऊनलोड, वैयक्तिक माहिती यासाठी कमीत कमी क्लिक करा. शक्यतो हे सगळे आणि शेअरिंग ही टाळा. संशयास्पद, कधी न ऐकलेल्या, माहित नसलेल्या,साईटस, लिंक्स, फोटोज, व्हिडिओ,मोठी सूट देणाऱ्या ऑफर्स,पोस्टस,मेसेजेस, यावर क्लिक करत जाऊ नका. आपला संबंध नसणाऱ्या, अनावश्यक आणि अनोळखी गोष्टी पासून दूर रहा.

## १५ पोलिसांना तात्काळ माहिती द्या.

कोणत्याही प्रकारचा आणि कितीही लहान मोठा सायबर गुन्हा निदर्शनास येताच तात्काळ पोलीस स्टेशन किंवा सायबर शाखेला कळवा. संबंधित अधिकाऱ्यांना त्याची सर्व माहिती नोंदी लगेच देणे आवश्यक आहे. तुम्ही तोंड देत असलेल्या गुन्ह्याचा यामुळे तपास लागेलच मात्र त्याच बरोबर गुन्हेगाराची पद्दत ओळखून त्याने आणखी कोणाला त्रास देण्यापूर्वी त्याला रोखता येईल.

# बुलडाणा जिल्हा पोलीस - दूरध्वनी सूची

| वरिष्ठ अधिकारी कार्यालय | दूरध्वनी क्रमांक |
|---|---|
| पोलीस अधीक्षक, बुलडाणा | ऑफिस - ०७२६२-२४२३९५<br>नि.स्थान - ०७२६२-४२३०३ |
| अप्पर पोलीस अधीक्षक, बुलडाणा | ऑफिस - ०७२६२-२४४९२५<br>नि.स्थान - २४२४६६<br>ऑफिस - २०२ |
| अप्पर पोलीस अधीक्षक, खामगाव | ०७२६३ -२५२०४८ |
| पो.उपअधिक्षक (गृह) | ०७२६२ -२४२१०१ |
| उपविभागीय पोलीस अधिकारी, मलकापूर | ०७२६७ - २२२३६८ |
| उपविभागीय पोलीस अधिकारी, बुलडाणा | ०७२६२ - २४२३२६ |
| पो.उपअधिक्षक, अर्थिक गुन्हे शाखा, चिखली | ०७२६२ - २४२७३८ |
| उपविभागीय पोलीस अधिकारी<br>देउळगावराजा, सिंदखेडराजा | ०७२६१ - २३१६५० |
| उपविभागीय पोलीस अधिकारी, मेहकर | ०७२६८ - २२५९७५ |
| उपविभागीय पोलीस अधिकारी, खामगांव | ०७२६३ - २५२१६७ |
| उपविभागीय पोलीस अधिकारी, जळगांव जा. | ०७२४ - २४३४१११ |
| पोलीस उपअधिक्षक,<br>लाचलुचपत प्रतिबंध शाखा, बुलडाणा | ०७२६२ - २४२५४८ |

# बुलडाणा जिल्हा पोलीस संपर्क क्रमांक

| अ.क्र | कार्यालय | एसटीडी कोड | दूरध्वनी |
|---|---|---|---|
| | **उपविभाग बुलडाणा** | | |
| १. | बुलडाणा शहर | ०७२६२ | २४२३२७ |
| २. | बुलडाणा ग्रामीण | ०७२६२ | २४१२५५ |
| ३. | बोराखेडी | ०७२६७ | २४५२२६ |
| ४. | धामणगाव बढे | ०७२६७ | २४१५४१ |
| ५. | चिखली | ०७२६४ | २४२०६७ |
| ६. | अमडापूर | ०७२६४ | २६४०३४ |
| ७. | धाड | ०७२६२ | २६५१३२ |
| ८. | रायपूर | ०७२६२ | २७००३० |
| | | | |
| | **उपविभाग मेहकर** | | |
| १. | मेहकर | ०७२६८ | २२४५३६ |
| २. | डोणगांव | ०७२६८ | २६६२४० |
| ३. | जानेफळ | ०७२६८ | २६२५३३ |
| ४. | साखरखेर्डा | ०७२६४ | २६६०३८ |
| ५. | लोणार | ०७२६० | २२१३२१ |
| ६. | बिबी | ०७२६० | २७१२५० |
| | | | |
| | **उपविभाग देउळगांव राजा** | | |
| १. | देउळगांव राजा | ०७२६१ | २३२००२ |
| २. | सिंदखेड राजा | ०७२६९ | २३४२४४ |
| ३. | किनगांव राजा | ०७२६९ | २६४४३३ |
| ४. | अंढेरा | ०७२६१ | २६५०३३ |

| | | | |
|---|---|---|---|
| **उपविभाग खामगांव** | | | |
| १. | खामगांव शहर | ०७२६३ | २५२०३८ |
| २. | शिवाजी नगर | ०७२६३ | २५२१४२ |
| ३. | खामगांव ग्रामीण | ०७२६३ | २५२२९५ |
| ४. | पिंपळगांव राजा | ०७२६३ | २७१२३४ |
| ५. | हिवरखेड | ०७२६३ | २६६६३६ |
| ६. | शेगांव शहर | ०७२६५ | २५२०१० |
| ७. | शेगांव ग्रामीण | ०७२६५ | २५३०१० |
| ८. | जलंब | ०७२६५ | २७७५४२ |
| | | | |
| **उपविभाग मलकापुर** | | | |
| १. | मलकापूर शहर | ०७२६७ | २२२०१८ |
| २. | मलकापूर ग्रामीण | ०७२६७ | २२२२५८ |
| ३. | एमआयडीसी दसरखेड | ०७२६७ | २६२४०० |
| ४. | नांदुरा | ०७२६५ | २२१०२८ |
| ५. | जळगांव जा. | ०७२६६ | २२१५३० |
| ६. | तामगांव | ०७२६६ | २३२२३२ |
| ७. | सोनाळा | ०७२६६ | २३८५३८ |
| | | | |
| **स्थानिक शाखा** | | | |
| १. | आर्थिक गुन्हे शाखा | ०७२६२ | २४२७३८ |
| २. | स्थानिक गुन्हे शाखा | ०७२६२ | २४२७३८ |
| ३. | जिल्हा विशेष शाखा | ०७२६२ | २४१०४० |
| ४. | कल्याण शाखा/ सायबर सेल | ०७२६२ | २४७७६७ |
| ५. | FRO/पासपोर्ट | ०७२६२ | २४१०४० |
| ६. | नियंत्रण कक्ष बुलडाणा | ०७२६२ | २४२४०० |



☆☆☆ सद्रक्षणाय खलनिग्रहणाय ☆☆☆

# बुलडाणा जिल्हा पोलीस दल